# प्रज्ञा मानस संशोधिका आणि विश्वकर्मा युनिवर्सिटी संयुक्त कामाचा आढावा (फेब्रुवारी २०२०-जानेवारी २०२१)

**प्रत्यक्ष करार :** विश्वकर्मा विद्यापीठ यांच्या सोबत सहयोगी काम करण्यासंदर्भात बैठक झाली. बैठकीस विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, उपाध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे व संशोधन विभाग अधिष्ठाता डॉ. योगेश देशपांडे यांच्यासोबत वाच. अनघा लवळेकर, वाच. सुजला वाटवे, वाच. वनिता पटवर्धन व वाच. सुचरिता गद्रे ह्या उपस्थित होत्या. फेब्रुवारी २०२० मध्ये विश्वकर्मा विद्यापीठ पुणे ह्यांच्या सोबतची MOU प्रक्रीया पूर्ण झाली. ह्या अंतर्गत संयुक्त संशोधन प्रकल्प आणि अन्य विविध प्रकारचे विषय तज्ञतेचे सहाय्य परस्परांना करण्याचे नियोजित आहे.

## प्रस्तावित कामांचा आढावा :

१) **PhD संदर्भातील विषय तज्ञता सहाय्य** : डॉ. योगेश देशपांडे यांच्यासोबत MOU संदर्भातील एक बैठक झाली. त्याप्रमाणे त्याचाच एक भाग म्हणून देवता अणेकर यांच्या Ph.D. च्या अभ्यासासाठी 'मनशोध' चाचणी वापरायची आहे. त्याचे कामाचे स्वरूप निश्चित झाले. त्यांच्याकडून मनशोध चाचणी सोडवून घेतली. मनोमापनशास्त्र विभागामध्ये कामाचे स्वरूप काय असते याची माहिती त्यांना दिली.त्यानुसार देवताअणेकर ह्यांनी मनशोध चाचणीचे मोबाईल वर चालणारे app सिद्ध केले. त्याचे try out घेऊन ते पूर्ण केले. आता प्रत्यक्ष data गोळा होईल तसे त्याचे रिपोर्ट्स तयार होतील. तसेच ह्याच विषयातील जे विवेकनिष्ठ विचारांचे प्रशिक्षण sample ला द्यायचे आहे त्याच्या साधन व्यक्ती ( resource persons) निश्चित झाले आहेत. त्याचा प्रस्ताव : विश्वकर्मा विद्यापीठाकडे सादर झाला आहे. त्यासाठीच्या अपेक्षित खर्चासाठी निधी उपलब्ध झाला कि ते कामही सुरु होईल. दोन्ही संस्था त्यासाठी प्रयत्न करत आहेत.

२) **अंतरवासिता उपलब्धी**: विश्वकर्मा विद्यापीठाचे मानस शास्त्र शाखेतील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या ( MA-I ) विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा मानस संशोधिकेने अंतर्वासितेचे नियोजन केले. ह्या अंतर्गत पाच विद्यार्थ्यांनी प्रज्ञा मानस संशोधिकेत सहा आठवडे वेगवेगळया विभागांमधून कामाचा अनुभव घेतला. २६-१-२०२० ला प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी माजी विद्यार्थी संघ, ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट ह्यांनी योजलेल्या किशोरवयीन मुलांच्या समस्या आणि गरजा ह्यावर योजलेल्या एक दिवसीय कार्यशाळा–परिवादातही ह्या कामाचा एक भाग म्हणून त्यांनी सहाय्य केले. त्यासंदर्भात

प्रा. भूपेंद्र सिंग ह्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ( ‘After the successful completion of their Internship, students shared with me their valuable experiences learnt at JPIP departments. I felt it as very effective and useful time spent by our students at JPIP )

३) ‘संयम’ ह्या किशोरवयीन मुलांमधील व्यसन परावृत्ती साठी चालू असलेल्या प्रकल्पामध्ये प्रज्ञा मानस संशोधिकेच्या पदव्युत्तर पदविका वर्गाच्या काही विद्यार्थ्यांनी विश्वकर्मा विद्यालयातील ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी २२ शालेय तासिकाची प्रशिक्षण सत्रे घेतली.

४) **'विश्वकर्मा विद्यापीठ' यांच्या सोबत इंजिनीरिंग च्या शाखेत शिकणाऱ्या मुलांसाठी** व्यावसायिक करियरसाठी उपयुक्त ठरणाऱ्या क्षमतांचा 'मानसपट आरेखन' (Work Place Psycho Profile) संदर्भात सध्या काम सुरु आहे. पथदर्शी अभ्यासासाठी ज्या १८ जणांचे चाचणीकाम केले होते त्यांचे रिपोर्ट अंतिम झाले. त्या संदर्भात अनघा ताई , सुजल ताई यांची **विश्वकर्मा** विद्यापीठ' यांच्या अधिकाऱ्यांसोबत ऑनलाईन बैठक पार पडली, तसेच डॉ चेतन कापडणीस व प्रोफ. भूपेंदर सिंग (मानसशास्त्र विभाग प्रमुख) यांच्या सोबत गौरी कुलकर्णी यांचे पुढील कामाच्या संदर्भात बोलणे झाले. त्यानुसार विश्वकर्मा विद्यापीठाचे संगणक विभागप्रमुख प्रा. थावरे आणि त्यांच्या सहकारी विद्यार्थ्यांनी ह्या चाचण्या सोडवून पहिल्या व त्याचे संगणकीकरण करण्याची सुरुवात केली आहे. हे काम एखाद्या महिन्यात पूर्ण होऊन ह्या चाचण्यांची प्राथमिक तपासणी फेरी सुरु व्हावी अशी अपेक्षा आहे.

५) BRACHT संचालित शाळांमध्ये १०वी आणि १२वीत शिकणाऱ्या मुलांचे ऐच्छिक अभिक्षमता मापन तसेच ७वी ते ९वी च्या मुलांचे मानस पट आरेखन करणे असा प्रस्ताव होता परंतु करोनाच्या अनपेक्षित संकटामुळे ते लांबणीवर पडले. आता केलेल्या बदलांमुळे संगणकावरून इंटरनेट च्या मदतीने ह्या चाचण्या सहज सोडवता येऊ शकतात. त्यामुळे तसे नियोजन करता येणे शक्य आहे.

हा गेल्या वर्षातील कामांचा एक ढोबळ आढावा घेतला आहे. ह्यातील काही कामे ह्या वर्षी ( २०२१) पूर्ण होतील . त्याशिवाय काही संयुक्त उपक्रम नव्याने सुरु करायचे असल्यास त्याबद्दल अवश्य चर्चा करूया.

अनघा लवळेकर
ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था , पुणे